||श्री||

**डोक्टर सुरेश पाठक यांना शिवसमर्थ पुरस्कार**



"पत्रद्वारा दासबोध अभ्यास" उपक्रमाचे नशिक विभागाचे उपसंयोजक डोक्टर सुरेश पाठक यांना "समर्थ व्यासपीठाचा शिवसमर्थ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

मानपत्र ,शाल, श्रीफळ आणि रु. १३,०००/- दक्षिणा असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. समर्थ व्यासपीठाचे मार्गदर्शक - विश्वस्त " स्वामी गोविंदगिरी" यांचे हस्ते संगमनेर येथे हा पुरस्कार देण्यात आला.या प्रसंगी स्वामी गोविंदगिरी म्हणाले- "माझ्या वडिलांनी मला दासबोधातील दोन समास वाचल्याखेरीज जेऊ दिले नाही, त्यामुळे माझ्या जीवनाला योग्य आकार प्राप्त झाला.दासबोध अभ्यासाची ही दिक्षा डोक्टर सुरेश पाठक यांनी शेकडो अभ्यासार्थींना दिली म्हणून ते आज सत्कारास पात्र आहेत"

प्रारंभी श्री. सुनील चिंचोलकर यांनी डोक्टर सुरेश पाठक यांचा परिचय करुन दिला.

नाशिकहून ८० अभ्यासार्थी या कार्यक्रमासाठी आले होते. अभ्यासार्थी प्रतिनिधी सौ. मुग्धा जोशी यांनी भावपूर्ण शब्दांत डोक्टर पाठक यांच्या गौरवपूर्ण कार्याचा लोकांना परिचय करुन दिला. सौ. वीणाताई दाढे यांनी मानपत्राचे वाचन केले. सत्काराला उत्तर देताना डोक्टर सुरेश पाठक म्हणाले,या पुरस्काराचे श्रेय सर्व अभ्यासार्थी आणि माझ्या सर्व कुटुंबीयांना आहे.लहानपणी आई- वडिलांनी माझ्यावर केलेल्या चांगल्या संस्काराचे हे फळ आहे"

शेवटी व्यासपीठाच्या अध्यक्षा डोक्टर सौ. सरोज तपस्वी यांनी सर्वांचे आभार मानले. श्री. संजय मालपाणी यांचे सहकार्य आणि उत्कृष्ट आयोजन यामुळे कार्यक्रम व्यवस्थित पार पडला.

**॥ जय जय रघुवीर समर्थ ॥**